क्र.पोमसं/अपोमसं/ररापोबल/04/दैनिक कवायत/2021/ 1755

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -400 001
दिनांक : 06/08/2021

09 AUG 2021

**पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र. 02/2021**

**विषय :-राज्य राखीव पोलीस बलाच्या गट मुख्यालयात असलेल्या कंपन्यांच्या नियमित कवायतीच्या नियोजनाचे वेळापत्रक...**

*****

राज्य राखीव पोलीस बल महाराष्ट्र राज्य हे अंतर्गत सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, नक्षल विरोधी अभियान, कायदा व सुव्यवस्था राखण्यामध्ये नेहमीच अग्रभागी असते. अत्यंत कठीण परिस्थितीमध्ये कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी बलातील अधिकारी / अंमलदार यांना कायम सशक्त व सक्षम राहणे अत्यावश्यक आहे. यास्तव राज्य राखीव पोलीस बलाच्या गट मुख्यालयात असलेल्या कंपन्यांकरिता कवायत नियमितपणे घेण्यासाठी दैनिक वेळापत्रक सोबत संलग्न करण्यात आले आहे. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल यांनी सदर आदेशाबाबत त्यांच्या गटातील कंपन्यांना अवगत करून, गट मुख्यालयात असलेल्या कंपन्यांच्या नियमित कवायतीसाठी ह्या दैनिक वेळापत्रकाची तात्काळ अंमलबजावणी सुरू करण्यात यावी.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल यांनी त्यांच्या गटातील नियमित कवायतीसाठी सदर वेळापत्रक अनुसरण्यात येईल याची दक्षता घ्यावी. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि परिक्षेत्रीय पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल यांच्या गटभेटीवेळी आदेशाच्या अंमलबजावणीबाबत तपासणी करण्यात येईल.

(सहपत्र :- वेळापत्रक तक्ता)

(संजय पांडे)
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट
प्राचार्य, राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज

## राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य

## राज्य राखीव पोलीस बलाच्या गट मुख्यालयात असलेल्या कंपन्यांकरीता दैनिक कवायत वेळापत्रक

| तासिका | पहीला तास | दुसरा तास | | तिसरा तास | चौथा तास | | पाचवा तास | सहावा तास | सातवा तास | हजेरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिवस / वेळ | ०७.०० ते ०७.४० | ०७.४५ ते ०८.३० | ०८.३० ते ०९.१५ | ०९.१५ ते ०९.५५ | १०.०० ते ११.०० | ११.०० ते १५.०० | १५.०० ते १६.०० | १६.०५ ते १७.०५ | १७.१० ते १७.५५ | १८.०० |
| सोमवार | कंपनी ड्रील | | नास्ता ब्रेक | प्लाटुन ड्रील | शस्त्र हाताळणी ७.६२ एमएम एसएलआर | जेवण ब्रेक | रारापोबल अधिनियम १९५१ व इतर महत्वाचे कायदे याबाबत मार्गदर्शन | श्रमदान | खेळ | हजेरी |
| मंगळवार | समारंभ कवायत आणि जमाव विसर्जन सराव | | | शस्त्र कवायत | शस्त्र हाताळणी ७.६२ एमएम ए के ४७ | | टॅक्टीक्स बाबत मार्गदर्शन | श्रमदान | खेळ | हजेरी |
| बुधवार | पी.टी. | ऑबस्टॅकल कोर्स | | प्लाटुन ड्रील | शस्त्र हाताळणी ९ एमएम कार्बाइन | | फिल्ड क्राफ्ट बाबत मार्गदर्शन | श्रमदान | खेळ | हजेरी |
| गुरुवार | कंपनी ड्रील | | | गार्ड माऊंटींग | शस्त्र हाताळणी एल एम जी / आधुनिक शस्त्रांबाबत मार्गदर्शन व हाताळणी | | * विविध विषयांवर मार्गदर्शन | श्रमदान | खेळ | हजेरी |
| शुक्रवार | समारंभ कवायत आणि जमाव विसर्जन सराव | | | शस्त्र कवायत | शस्त्र हाताळणी ५.५६ एम एम इन्सास | | फिल्ड क्राफ्ट प्रात्याक्षिक सराव व स्फोटकांबाबत मार्गदर्शन | | | हजेरी |
| शनिवार | रोड रन वॉक व क्रॉस कंट्री | | | लाठी कवायत | गॅस गन, गॅस शेल्स आणि गॅस ग्रिनेड हाताळणी व मार्गदर्शन | | जमाव विसर्जन सराव | | खेळ | हजेरी |
| रविवार | पी.टी. | योगा, मेडीटेशन | | लाठी कवायत | ३६ एच ई ग्रिनेड हाताळणी व मार्गदर्शन | | मॅप रिडींग व जीपीएस बाबत मार्गदर्शन | रायफल सफाई | श्रमदान | हजेरी |

*** विविध विषयांवर मार्गदर्शन उदा. आरोग्य, आहार, ताण तणाव, वित्तीय नियोजन, व्यवस्थापन कौशल्य, आपत्ती व्यवस्थापन, प्रथमोपचार, संवाद कौशल्य, मनुष्यबळ नियोजन, वेळेचे नियोजन, लिडरशीप इ. याबाबत समादेशक, रारापोबल यांनी स्थानिक पातळीवर नामांकीत व्याख्याते यांचेशी समन्वय साधुन व्याख्यान आयोजनाबाबत आवश्यक कार्यवाही करावी.**